लोकमत अकोला, रविवार, दि. ११ ऑगस्ट २०१३

# शिवाजी महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

चिखली : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत स्थानिक श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील बीएससीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या बीएससी अंतिम वर्षाचा निकाल ८१ टक्के लागला आहे. यामध्ये वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र या विषयाचा १०० टक्के, तर गणित ९१, परमाणुशास्त्र ९६ व संगणकशास्त्राचा ८२ टक्के निकाल लागला आहे. अंतिम वर्षाच्या कुंदन भोंडेकर ८४ टक्के व दीपाली आंबेकर ८२ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. याशिवाय पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या २०१३ च्या पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर नीलेश शेळके ८ तर अजय भोसले ११ वा मेरीट आला आहे. परमाणुशास्त्र विषयात १७ टक्के विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत झाले असून, वनस्पतिशास्त्र विषयात सर्व विद्यार्थ्यांनी प्रवीण्यश्रेणी प्राप्त केली आहे. बीएससी द्वितीय वर्षातून वरुण महाले याने ८८ टक्के, तर प्रथम वर्षात स्वप्निल काळे याने ८३ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.